RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक १६३] बुधवार, डिसेंबर २९, २०२१/पौष ८, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३९१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ डिसेंबर २०२१.

### अधिसूचना

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक मगाद-२०२१/ प्र.क्र.११४/ म-१०.—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) च्या कलम-४ च्या पोट-कलम (१) चे खंड (पाच) आणि (सहा) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने जी अधिसूचना काढण्याचे प्रस्तावित केले आहे, त्या अधिसूचनेचा पुढीलप्रमाणे मसुदा, उक्त कलम - ४ च्या पोट-कलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे; आणि याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, दिनांक २९ जानेवारी २०२२ रोजी किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन उक्त मसुदा विचारात घेईल.

२. उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना जिल्हाधिकारी अहमदनगर, हातमपुरा ४१४ ००१ यांच्याकडे उपरोक्त तारखेस किंवा त्यापूर्वी येतील त्या शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### अधिसूचनेचा मसुदा

क्रमांक मगाद- २०२१/ प्र.क्र.११४/ म-१०. —महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) च्या कलम- ४ च्या पोट-कलम (१) चे खंड (पाच) आणि (सहा ) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या तसेच याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर अधिकारांचा वापर करून आणि पूर्वीच्या सर्व अधिसूचना किंवा आदेश अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात समाविष्ट असलेल्या मौजे ढोलेवाडी व मौजे गुंजाळवाडी गावांच्या संदर्भातील जेथवर संबंधित असतील तेथवर त्यामध्ये फेरफार करून महाराष्ट्र शासन पूर्वीच्या अधिसूचना किंवा आदेश अंशतः बदल करून उक्त अधिनियमाच्या कलम-४ च्या पोट-कलम (पाच) आणि (सहा), द्वारे आवश्यक केलेल्या पूर्वप्रसिद्धीनंतर खालील अनुसूचीमध्ये नमूद केल्यानुसार अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील अनुक्रमे मौजे ढोलेवाडी व

मौजे गुंजाळवाडी यांच्या सर्व्हे नंबरमध्ये फेरबदल करून दिनांक २९ जानेवारी, २०२२ पासून अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील अनुक्रमे मौजे ढोलेवाडीतील सर्व्हे नंबर वगळून अहमदनगर जिल्ह्यांतील संगमनेर तालुक्यातील मौजे गुंजाळवाडी गावामध्ये समाविष्ट करण्यात येईल, असे विनिर्दिष्ट करीत आहे

**अनुसूची**

| अ. क्र. (१) | मौजे ढोलेवाडी तालुका-संगमनेर जिल्हा - अहमदनगर मध्ये समावेश असलेले सर्व्हे नंबर (२) | सदर अधिसूचना निर्गमित करण्यापूर्वीचा स्तंभ (२) मध्ये दर्शविलेले सर्व्हे नंबर समावेश असलेले गाव (३) | सदर अधिसूचना निर्गमित केल्यानंतरचा स्तंभ (२) मध्ये दर्शविलेले सर्व्हे नंबर समावेश असलेले गाव (४) |
|---|---|---|---|
| १. | २०,२१,२२,२३,२४,२५ | मौजे ढोलेवाडी | मौजे गुंजाळवाडी |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रविराज फल्ले,**
शासनाचे सह सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 29th December 2021.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No. MGAD-2021/C.R.114/M-10.– The following draft notification, which the Government of Maharashtra proposes to issue in exercise of the powers conferred by clause (*v*) and (*vi*) of sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), is hereby published as required by sub-section (*4*) of the said section 4 for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 29th January 2022.

2. Any objections or suggestions, which may be received by the Collector Ahmadnagar, Hatampura, Ahmadnagar 414 001, from any person with respect to the said draft notification before the aforesaid date will be considered by the Government.

*DRAFT NOTIFICATION*

No. MGAD-2021/C.R.114/M-10.–In exercise of the powers conferred by clauses *(v)* and *(vi)* of sub-section *(1)* of section 4 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), and of all other powers enabling it in this behalf, and in partial modification of any previous notifications or orders issued in this behalf and in force in the State or any part thereof, in so far as they relate to the villages specified in the Schedule appended hereto, the Government of Maharashtra hereby alters, with effect from the dated 29th January 2022 the limits of village Dholewadi and village Gunjalwadi in Taluka Sangamner, District Ahmadnagar respectively, by excluding the Survey numbers mentioned in column *(2)* of the Schedule from village Dholewadi, Taluka Sangamner, District Ahmadnagar and including it in village Gunjalwadi, Taluka Sangamner, District Ahmadnagar.

*Schedule*

| Sr. No. (1) | Survey number in Village Dholewadi, Taluka Sangamner, District Ahmadnagar (2) | Name of the village in which survey numbers mentioned in column *(2)* are included prior to issue of this notification. (3) | Name of the village in which survey numbers mentioned in column *(2)* are included after issue of this notification. (4) |
|---|---|---|---|
| 1. | 20,21,22,23,24,25 | Dholewadi | Gunjalwadi |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAVIRAJ PHALLE,

Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.